05 DEC 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उत्तरपत्रिकांची 'ऑन स्क्रीन' तपासणी होणार

## हिवाळी सत्र परीक्षेपासून विद्यापीठाची अंमलबजावणी : कमी वेळेत होणार मूल्यमापन

■ संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ४ : कमी वेळेत मूल्यमापन पूर्ण करून निकाल लावण्याचे आव्हान पेलण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने आता उत्तरपत्रिकांची 'ऑन स्क्रीन' तपासणी करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी ऑन स्क्रीन मार्किंग (ओएसएम) अथवा डिजिटल इव्हॅल्युएशन सिस्टीम या संगणकीय प्रणालीचा अवलंब परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून केले जाणार आहे. या प्रणालीचा वापर सध्या सुरू असलेल्या हिवाळी सत्रातील परीक्षांतील काही निवडक पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी केला जाणार आहे.



उन्हाळी आणि हिवाळी सत्रामध्ये विद्यापीठ प्रत्येकी आठशेहून अधिक परीक्षा घेते. या परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अडीच लाख इतकी आहे. त्यांच्या उत्तरपत्रिकांची तपासणी पारंपरिक पद्धतीने विद्यापीठातर्फे केली जाते. मात्र, कायमस्वरूपी शिक्षकांची कमतरता असल्याने मूल्यमापनाचे काम वेळेत पूर्ण करताना परीक्षा मंडळाची कसरत होत आहे.

त्यावर ही प्रक्रिया वेळेत, अचूकपणे करण्यासाठी विद्यापीठाने संगणक प्रणालीचा वापर करण्याचे ठरविले आहे. सध्या सुरू असलेल्या परीक्षांमधील एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी. या अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिकांची तपासणी या प्रणालीद्वारे केली जाणार आहे. दैनंदिन कामकाजात 'आयसीटी'चा वापर परीक्षा मंडळ वेगाने करत आहे. उत्तरपत्रिका मूल्यमापनापूर्वी या मंडळाने दीक्षांत प्रमाणपत्र आणि प्रोव्हिजनल सर्टिफिकेट वितरण, शुल्क आकारणी, पेपर सेटिंग व एसआरपीडीद्वारे त्याचे वितरण सुरू केले आहे.

### अशी आहे प्रक्रिया

■ या 'ओएसएम' प्रणालीमध्ये उत्तरपत्रिका स्कॅन करून ती 'पीडीएफ'मध्ये एक सांकेतिक क्रमांक देऊन परीक्षकांना त्यांच्या लॉगीनवरून उपलब्ध करून दिली जाईल. परीक्षकाने लॉगीन केल्यानंतर त्याला रँडम पद्धतीने एक उत्तरपत्रिका मूल्यमापनासाठी उपलब्ध होईल. मूल्यमापन करताना या प्रणालीमध्ये उपलब्ध असणाऱ्या प्रश्नपत्रिका, आदर्श उत्तर पत्रिका, प्रश्न निहायगुण यांचा वापर परीक्षकांना करता येईल.

### दृष्टिक्षेपात...

- संलग्नित महाविद्यालये : २७६
- कॅम्पसमधील अधिविभाग : ३४
- एकूण विद्यार्थी : २ लाख ५० हजार

### अचूकता वाढणार

■ या प्रणालीमुळे प्रत्येक महाविद्यालय मूल्यमापन केंद्र म्हणून कार्यरत राहील. शिक्षकांना (परीक्षक) त्यांच्या महाविद्यालय किंवा नजीकच्या महाविद्यालयातून उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करता येईल. त्यामुळे त्यांच्या वेळेची, प्रवास खर्चाची बचत होईल. मूल्यमापन कामकाजात गोपनीयता, अचूकता, गतिमानता येईल. गुणांच्या बेरजेमधील त्रुटी राहणार नाही. प्रत्येक दिवशी विषयनिहाय मूल्यमापनाची माहिती विद्यापीठाला डॅशबोर्डद्वारे मिळणार आहे. फोटोकॉपी, पुनर्मूल्यांकन, फेरतपासणी प्रक्रियेची गती वाढणार आहे. निकाल कमीत कमी वेळेत जाहीर करता येणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

> “ निकाल कमीत-कमी दिवसांमध्ये लावण्यासाठी उत्तरपत्रिका मूल्यमापनाचा टप्पा वेळेत पूर्ण होणे सर्वांत महत्त्वाचे आहे. त्यातील अचूकता, गती वाढविण्यासाठी विद्यापीठाने ऑन स्क्रीन मार्किंग प्रणालीच्या वापराचे पाऊल टाकले आहे. सध्या या प्रणालीद्वारे काही निवडक अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिकांची तपासणी केली जाईल. टप्प्याटप्प्याने या प्रणाली वापराची व्याप्ती वाढविण्यात येईल.
>
> **-डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 DEC 2024

पुण्यनगरी

# 'शहाजी'च्या खेळाडूंचे बॉक्सिंगमध्ये यश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय बॉक्सिग स्पर्धेमध्ये शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या खेळाडूंनी यश संपादन केले. ७ बॉक्सिग खेळाडूंनी सुवर्णपदक प्राप्त केले. यामध्ये गायत्री कल्याण भड, आदित्य जाधव, तन्मय कळंत्रे, राज पाटील, संदेश काटकर, प्रणव रोडे, ओम हिरूर यांनी सुवर्णपदक पटकावले. विजेत्या खेळाडूंची पंजाब भटिंडा येथे होणाऱ्या अखिल भारतीय विद्यापीठ बॉक्सिग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विजेत्या खेळाडूंना श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, संस्थेचे रजिस्ट्रार रूपेश खाडेकर, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, रजिस्ट्रार रवींद्र भोसले, अधीक्षक मनीष भोसले, डॉ. राहुल मांडणीकर, डॉ. अनिल बलगुडे, जिमखाना विभागप्रमुख डॉ. प्रशांत पाटील, क्रीडाशिक्षक प्रशिक्षक प्रा. प्रशांत मोटे आदींचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 DEC 2024
तरुण भारत

# ‘शहाजी’च्या खेळाडूंचे बॉक्सिंग स्पर्धेत यश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभागात झालेल्या विद्यापीठ आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये शहाजी कॉलेजमधील ७ खेळाडूंनी सुवर्णपदक प्राप्त केले. सुवर्णपदक विजेत्यांमध्ये गायत्री भड, आदित्य जाधव, तन्मय कळत्रे, राज पाटील, संदेश काटकर, प्रणव रोडे, ओम हिरूर यांचा समावेश आहे. या खेळाडूंची पंजाब भटिंडा येथे होणाऱ्या अखिल भारतीय विद्यापीठ बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विजेत्या खेळाडूंना शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग विजयराव बोंद्रे (दादा), संस्थेचे रजिस्ट्रार रुपेश खाडेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, रवींद्र भोसले, अधीक्षक मनीष भोसले, डॉ. राहुल मांडणीकर, डॉ अनिल बलगुडे, डॉ. प्रशांत पाटील, प्रा. प्रशांत मोटे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 DEC 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांना प्रारंभ

ककोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत सुरू झाल्या आहेत. २०२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध १८७ परीक्षा केंद्रांवर सुरळीत पार पडल्या. या परीक्षांसाठी ४२ हजार ७१४ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठाने या परीक्षांत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. या पथकाकडून कोल्हापुरातील २४, सांगलीतील १० व साताऱ्यातील ५ अशा एकूण ३९ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 DEC 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठ परीक्षेस ४२ हजार विद्यार्थी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. बुधवारी विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा पार पडल्या. त्यासाठी ४२ हजार ७१४ विद्यार्थी उपस्थित होते.

दिवसभरात विविध २०२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने घेण्यात आल्या. या परीक्षांचे आयोजन १८७ परीक्षा केंद्रांवर करण्यात आले होते. या परीक्षांसाठी ४२ हजार ७१४ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विद्यापीठाकडून भरारी पथके स्थापन केली आहेत. बुधवारी एकूण ३९ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे. यामध्ये कोल्हापूरमधून २४, सांगली जिल्ह्यातील १० व सातारा जिल्ह्यातील ५ गैरप्रकारांचा समावेश आहे. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले.